# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/जालना/४७०/२०१३/५४

तक्रार दाखल दिनांक :- ०१/१०/२०१३
निकाल दिनांक :- ३०/११/२०१३

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्या,
ॲडीशनल एम.आय.डी.सी.प्लॉट नंबर सी - ६४,
औरंगाबाद रोड जालना
(ग्राहक क्र.५१००३४३४१६६८)

अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत जालना विभाग जालना.

गैरअर्जदार

कोरम

एस.के.नरवडे सदस्यसचिव

विलासचंद्र सु. काबरा सदस्य

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे.अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०१/१०/२०१३ रोजी जालना मंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) तथा नोडल अधिकारी, यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक १५/१०/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

अपीलार्थी महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्या. अकोला हे महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यवसाय असून महाराष्ट्र राज्यातील शेतक-यांसाठी बियाणे पुरवठ्याचे काम ना नफा ना तोटा या तत्वावर शेतक-यांना कच्या बियाणावर प्रक्रिया करुन प्रमाणित स्वरुपात बियाणे उपलब्ध करुन देतात.

अपीआर्थी महाराष्ट्र राज्यात अनेक ठिकाणी बिज प्रक्रिया केंद्र आहेत. त्याचप्रमाणे जालना येथे नवीन एम.आय.डी.सी. औरंगाबाद रोड जालना येथे देखील अपीलार्थीचे बिज प्रक्रिया केंद्र आहे.

अपीलआर्थीच्या जालना येथील बिल प्रक्रिया केंद्रात कच्या बियाणावर प्रक्रिया होवून प्रमाणित बियाणे तयार केले जाते त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या मशिनरी वापराल्या जातात आणि त्या मशिनरीसाठी विद्युत पुरवठा प्रतिवादीकडुन अपीलार्थीने घेतलेला आहे.

अपीलआर्थीचे बिज प्रक्रिया केंद्र हे औद्योगिक या सदराखाली येते व त्याप्रमाणे सदरील बिज प्रक्रिया केंद्रास प्रतिवादीनी जो विद्युत पुरवठा केलेला आहे तो एलटी-व्ही या प्रकारात केलेला आहे.व औद्योगिक दराप्रमाणे विज आकारणी प्रतिवादींनी अपीलार्थीस केलेली आहे. अपीलार्थीचे दराप्रमाणे विज आकारणी प्रतिवादीनी अपीलार्थीस केलेली आहे.अपीलार्थीने प्रतिवादीने दिलेल्या विद्युत पुरवठ्याच्या बिलाप्रमाणे विद्युत वापराचे बिल नियमितपणे अदा केलेले आहे. व सध्या देखील विद्युत वापराचे बिल अपीलार्थी प्रतिवादीच्या कार्यालयात भरतात त्यामध्ये अपीलार्थीनी अद्यापपर्यंत कधीही कसूर केलेला नाही.

अपीलार्थीचे बिज प्रक्रिया केंद्र हे व्यापारी (कमर्शियल) सदरात येत नाही कारण सदर बिज प्रक्रिया केंद्रामधुन कोणत्याही बियाणाची विकी करण्यात येत नाही.बिज प्रक्रिया केद्रास वीज पुरवठा देखील करण्यात आलेला आहे. बिज प्रक्रिया केंद्रातून बियाणे विक्री केल्या जात नाही ते फक्त

बियाणावर प्रक्रिया केली जाते त्यामुळे आपीलार्थीचे बिज प्रक्रिया केंद्र हे कमर्शियल या सदरात येत नाही.अपीलार्थीचे बिज प्रक्रिया केंद्रास प्रतिवादीचे फिरते पथक औरंगाबाद यांनी दिनांक १९/०१/२०१२ रोजी भेट दिली आणि त्यांनतर अपीलार्थीला कमर्शियल या सदरात धरुन मागील ४१ महीन्याचे वीज बिल रक्कम रुपये ४,२९,१७७/- (चार लाख एकोनतीस हजार एकशे सत्याहत्तर रुपये) हे बेकायदेशीर दिले त्याच्या नाराजीने अपीलार्थीने प्रतिवादीच्या अंतर्गत तकार निवारण कक्षाकडे तकार अर्ज दिला होता. परंतु संबंधितांनी अपीलार्थीचा तक्रार अर्ज नामंजूर केला व दिलेले वीज बिल योग्य आहे व ते भरावे असा आदेश दिला आणि तो दिनांक २०/०८/२०१३ रोजी अपीलार्थीस कळवला. त्याच्या नाराजीने अपीलार्थी यांनी खालील मुद्यावर प्रस्तुतचे अपील दाखल केले आहे.

अपीलार्थीचे बिज प्रक्रिया केंद्र हे इंडस्ट्रीयल ॲक्टखाली नोंदणीकृत आहे च त्यानुसारच प्रतिवादीनी विद्युत पुरवठा केलेला आहे व त्या बिज प्रक्रिया केंद्रात फक्त ४० एच.पी.चा लोड मशिनरीसाठी वापरण्यात येतो. सदर बिज प्रकिया केंद्रामध्ये फक्त कच्या बियाणावर प्रक्रिया केली जाते तेथून कोणत्याही प्रकारची बियाणाची विक्री केली जात नाही ही बाब अंतर्गत तक्रार निवारण कक्ष यांना कळविण्यात आली होती.

अंतर्गत तक्रार निवारण कक्ष यांनी भरारी पथकाचे दोन अहवाल समोर असतांना पहिला अहवाल दुलर्क्षित केला याबाबत न्यायनिर्णयात कोणतेही स्पष्टीकरण केलेले नाही. वास्तविक पाहता दिनांक १९/०१/२०१२ चा अहवाल का स्विकारण्यात आला याबाबत स्पष्टीकरण न्यायनिर्णयामध्ये नमुद करणे कायद्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. परंतु त्यांनी सदर प्रकरणास जाणिवपुर्वक टाळून खात्याअंतर्गत बाब असल्यामुळे अपीलआर्थीने ४१ महीन्याची फरकाची रक्कम भरावी असा आदेश दिलेला आहे जो की बेकायदेशीर आहे त्यामुळे तो रद्द करण्यात येणे न्याय व योग्य होईल.

अपीलार्थीच्या बिज प्रक्रिया केंद्रात बियाणावर फक्त प्रक्रिया केली जाते विक्री केली जात नाही असा अहवाल भरारी पथक यांनी दिलेला आहे. याचाच अर्थ बिज प्रक्रिया केंद्र हे कमर्शियल या प्रकरात येत नाही असा होतो त्यामुळे सदर बिज प्रक्रिया केंद्राचे विद्युत कनेक्शन एलटी-व्ही औद्योगिक मीटर प्रमाणे वीज आकारणी करणे आवश्यक आहे व यापूर्वी केलेली वीज आकारणी योग्य असतांना देखील जाणिवपुर्वक अपीलार्थीस त्रास देण्याच्या गैरउदेशाने आणि अपीलार्थीकडून बेकायदेशीर मार्गाने जास्तीची रक्कम भरुन घेण्यासाठी भरारी पथकाने चुकीचे वीज बिल दिले ही बाब अंतर्गत तक्रार निवारण कक्ष जालना यांनी दुर्लक्षित करुन चुकीचा व बेकायदेशीर आदेश पारीत केलेला आहे त्यामुळे तो रद्द करण्यात येणे न्याय व योग्य होईल.

बिज प्रक्रिया केद्र हे औद्योगिक प्रकारात येते. ते व्यावसायिक प्रकारात येत नाही ही बाब दुलर्क्षित करण्यात आलेली आहे. तसेच प्रतिवादीना मागील फरकाचे बिल वसूल करण्याचा कोणताही अधिकार नाही. कारण अपीलार्थीने नियमिपणे वीज वापराचे वीज बिल पुर्वी भरलेले आहे. भरारी पथकाने दिनांक २८/०४/२००४ व दिनांक २८/०८/२०१० रोजी बिज प्रकिया केंद्रास भेट दिलेली आहे.

अंतर्गत तक्रार निवारण कक्ष जालना यांनी जा.क.अअ/जालना/ता/नं.२४०२ या प्रकरणात दिनांक ०८/०८/२०१३ रोजी दिलेला आदेश जो अपीलार्थीस दिनांक २०/०८/२०१३ रोजी कळविला आहे तो रद्द करण्यात यावा.

प्रतिवादीनी फिरते पथक औरंगाबाद यांच्या अहवालानुसार व्यावसायिक दराने लावलेले वीज बिलाची मागील ४१ महीन्याची रक्कम रुपये ४,२९,१७७/- (चार लाख एकोनतीस हजार एकशे सत्याहत्तर रुपये) ही रक्कम आकारुन दिलेले वीज बिल रद्द करण्यात यावे.

गैरअर्जदाराने त्याची बाजू माडंताना सांगितले की, अर्जदार मे. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, मर्या अकोला शाखा जालना ग्राहक कमांक ५१००३०३४१६६८ हे कंपनीचे ग्राहक आहेत. उपकार्यकारी अभियंता, फिरते पथक यांनी दिनांक १९/०१/२०१२ रोजी मे महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्या अकोला शाखा जालनाची स्थळ पाहणी केली व त्या ठिकाणी ग्राहकाकडून होत असलेल्या वीज वापराबाबतची तपासणी केली असता त्यांच्या निर्देशनास आले की,गाहकाचा वापर हा वाणिज्य स्वरुपाचा आहे. त्या ठिकाणी शेतक-यांकडुन घेतलेले धान्य गोडावून मध्ये साठवलेले जाते. त्याची ग्रेडींग केले जाते व त्याची साफ सफाई करुन ते पॅकींग करुन व्यापारी तत्वावर त्याची विक्री केली जाते.

उपकार्यकारी अभियंता फिरते पथक औरंगाबाद यांच्या ही बाब निर्देशनास आल्यानंतर त्यांनी ग्राहकाला दरसंकेतांकानुसार व्यावसायिक वापराचे फरक वीज देयकाची रक्कम Calculate केली व ती उपकार्यकारी अभियंता शहर उपविभाग,जालना यांच्या कडे ग्राहकाकडुन वसूलीसाठी पाठविली Assessment sheet दाखल करण्यात येत आहे. त्यानुसार ती फरकाची रक्कम वसूल करण्यासाठी ग्राहकाच्या वीज बिलामध्ये समाविष्ठ करण्यात आली.

अर्जदार यांच्या जालना शाखा मध्ये Manufacturing_ची कोणतीही Activity होत नसल्यामुळे उपकार्यकारी अभियंता, फिरते पथक, औरंगाबाद यांनी सुचवलेले फरकाचे वीज बिज हे बरोबर असून महावितरणला असे फरकाचे वीज बिज वसूल करण्याच्या अधिकार आहे. त्यामुळे उपकार्यकारी अभियंता, फिरते पथक, औरंगाबाद यांनी अर्जदार यांच्या मिटरचा वापर Industrial नसून Commercial आहे अशी चुकीची नोंद करुन Commercial Tariff लावले असे अर्जदार यांचे म्हणणे चुकीचे आहे. उपकार्यकारी अभियंता , भरारी पथक

यांना दिलेले फरकाचे Commercial Tariff प्रमाणेचे ४२९१७७/- रुपयाचे बिल बरोबर आहे. सदरचे बिल Tariff Difference प्रमाणे तयार केलेले असुन ते बरोबर आहे.

ग्राहकाने आपल्या तकार अर्जामध्ये त्यांचे बिज प्रक्रिया केंद्र हे इंडस्ट्रयल ॲक्ट खाली नोंदणीकृत आहे व त्यामुळे त्यांना औद्योगिक दराप्रमाणे वीज बिल आकारणी करण्यात यावी अशी मागणी केली आहे. परंतु ही विद्युत कायदा व त्या अंतर्गत असणारे विनियम यास धरुन नाही. संदर्भात MERC Case No. 111/2009 Dted 12/09/2010 मधील निकालाचा लागू असलेला भाग मा. मंचासमोर दाखल करण्यात येत आहे. सदर प्रकरणामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग यांनी स्पष्ट केले आहे की, एखाद्या विशिष्ट कायद्यान्वये ''उद्योग'' हे वर्गीकरण त्याच कायाद्याच्या संदर्भात असुन त्याचा आधार इतर कायद्यासाठी घेता येवु शकत नाही किंवा विद्युत नियामक आयोगाकडुन ठरविण्यात येत असलेल्या दर संकेतासाठी त्याचा कोणताही अधार घेवु शकत नाही तसेच सर्वसाधारणपणे अद्योगिक (Industrial) ही वर्गवारी अशा गतीविधीना लागू आहे जिथे उत्पादन Manufacturing होते असे मा. आयोगाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे शासनाच्या वेगवेगळ्या विभागाने Industry म्हणून अर्जदार यांना संबोधले म्हणून त्यांना Industrial Tariff लागू करावी हे अर्जदार यांचे म्हणणे चुकीचे आहे.

उपकार्यकारी अभिंयंता फिरते पथक, औरंगाबाद यांनी स्थळ पाहणी करतांना अर्जदार यांच्या जागेमध्ये चालत असलेल्या कामाचे स्वरुप नमुद केलेले आहे. त्या ठिकाणी सीड्स Cleaning Grading, seed treatment , Packing & Trading of various seeds होत असल्याचे आढळले व त्या ठिकाणी Manufacturing Activity होत असल्याचे दिसूनय आले नाही. स्थळ पाहणी ग्राहकाच्या उपस्थितीत केली असून त्यावर ग्राहकाची सही आहे.याच संदर्भात मा. विद्युत लोकपाल यांनी प्रकरण क. १४०/२००९ मध्ये दिलेल्या निकालाची प्रत मा.

अवलोकनार्थ दाखल करण्यात येत आहे. सदर निकालामधील मा विद्युत लोकपाल यांनी नोंदविलेले निरिक्षण प्रस्तूत प्रकरणाच्या संदर्भात महत्वापुर्ण असुन ते खालील प्रमाणे आहेत.

औद्योगिक (Industrial)_ह्या शब्दाची व्याख्या दर संकेतांक मध्ये अथवा विनियमामध्ये स्पष्ट केलेली नाही तेव्हा (Industrial) ह्या शब्दाचा अर्थ त्याच्या नैसर्गिक व प्रचलित अर्थानुसार लक्षात घेतला पाहीजे म्हणजेच त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात उत्पादन ( Manufacturing) होत असणे अभिप्रेत आहे. स्थळ पाहणी अहवाल मा.मंचासमोर आहे या वरुन या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे Manufacturing होत नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे ग्राहकास वाणिज्य वर्गवारी प्रमाणे देण्यात आलेले फरकाचे वीज बिल योग्य आहे,

प्रस्तत प्रकरणामध्ये ग्राहकास चुकीच्या वर्ग वारी नुसार पुर्वी देयके निर्गमीत करण्यात आली होती व ग्राहकाने वेळोवेळी वीज देयका प्रमाणेच परंतु कमी रक्कमेचा भरणा आता पर्यत केलेला आहे. दिनांक १९/०१/२०१२ रोजी करण्यात आलेल्या स्थळ पाहणी मध्ये ही बाब निर्देशनास आल्या नंतर ग्राहकास त्याचे योग्य दायित्व निर्धारीत करुन दिनांक ३०/०१/२०१२ रोजी वीज देयक निर्गमीत केले आहे.

ग्राहकास उपलब्ध असलेले मीटर वाचन वरुन त्याच्या योग्य वर्गवारी नुसार वीज देयक सादर करुन त्याची मागणी करण्यात आली आहे. विनियमातील तरतुदीनुसार ग्राहक हा दिनांक ३०/०१/२०१२ पासून थकबाकी आहे. तेव्हा प्रस्तुत ची मागणी ही विद्युत कायदा २००३ कलम ५६(२) नुसार नुसार

मुदत बाह्य नाही हे या ठिकाणी नम्रपणे स्पष्ट करण्यात येत आहे. या संदर्भात मा.उच्च न्यायालय,मुंबई यांचा ब्रहन्मुंबई म्युनसीपल विरुध्द यतीश शर्मा व इतर यांचा निवाडा मा. मंचासमोर अवलोकनार्थ दाखल करण्यात येत आहे.प्रस्तुत निवाड्यामध्ये मा. न्यायालयाने विद्युत

कायदा २००३ मधील कलम ५६(२) वर प्रकाश टाकत असतांना हे स्पष्ट केले आहे की,ग्राहक विजेचा उपभोग घेतो त्या वेळी त्याचे दायित्व जरी निश्चत होत असले तरी त्याला जो पर्यत वीज देयक सादर करण्यात येत नाही तो पर्यत विनियमानुसार त्याला थकबाकीदार म्हणता येत नाही कारण ५६(१) नुसार वीज पुरवठा खंडित करण्याचा अधिकार हा विजेचे मुल्य चुकते करण्यास ग्राहक करत असलेल्या टाळाटाळ व दुर्लक्षीतपणाशी जोडलेला आहे. तेव्हा जोपर्यत ग्राहकास वीज देयक सादर केले जात नाही तो पर्यत ग्राहकांने ते भरणा करण्यास दुर्लक्ष अथवा टाळाटाळ केली असे म्हणता येत नाही. प्रस्तुत प्रकरणात गाहकास दिनांक ३०/०१/२०१२ रोजी वाणिज्य वर्गवारी प्रमाणे देण्यात आलेले फरकाचे वीज देयक योग्य, नियमास धरुन व मुदतीत आहे,

गैरअर्जदाराच्या उपरोक्त युक्तीवादानंतर अर्जदार यांनी सांगितले की, बिज प्रक्रिया केंद्र हे मॅन्युफॅक्चरिंग युनिट आहे ते कमर्शियल युनिट नाही याबाबत मे जिंदल सिड्स कंपनी प्रा.लि. मे मार्कफिल्ड हायब्रिड सिडस् मे सनराईज फुड प्रोसेस यांनी जे रिप्रेझेंटेशन क. २५/२०१३,२६/२०१३,२७/२०१३दाखल केले होते त्यामध्ये मा.विद्युत लोकपाल नागपुर यांनी कॉमन ऑर्डर दिनांक ३१/०५/२०१३ रोजी दिलेली आहे. आणि त्यामध्ये सिड कंपन्यांना दिलेले कमर्शियल वापराचे देयक रद्द केलेले आहेत त्याची एक प्रत तकार अर्जदाराने लेखी युकीवादासोबत दाखल केली.

गैरअर्जदार यांना मागिल वीज देयक वसुल करुन मागण्याचा अधिकार नाही ही बाब देखील कायदेशीर आहे आणि गैरअर्जदार यांनी त्या कायदेशीर बाबीकडे दुर्लक्ष करुन मागील ४१ महीन्याचे बील तक्रार अर्जदारांना दिलेले आहे त्यामुळे ते बेकायदेशीर आहे म्हणून रद्द करण्यात येणे न्याय व योग्य होईल.

गैरअर्जदार यांनी त्यांच्या लेखी म्हणण्यासोबत सदर  न्यायनिवाडे दाखल करुन ते न्यायनिवाडे  या प्रकरणाशी संबंधित नाहीत व त्याचा त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात विचार करु नये  कारण तिन्हीही न्यायनिवाडे हे वेगळ्या पॉईटवर आहेत असे सांगितले.

सदर प्रकरणी मंचापुढे दोन्ही बाजुनी केलेला युक्तीवाद व सादर करण्यात आलेले विद्युत लोकपाल मुंबई , विद्युत  लोकपाल नागपूर व विज नियामक आयोग यांनी निर्गमीत केलेले आदेश याचे अवलोकन मंचाने केले असता हा मंच खालील प्रमाणे निर्ष्कष नोंदवितो.

गैरअर्जदाराने सादर केलेल्या  विद्युत लोकपाल मुंबई यांनी मे अतुल इंम्पेक्स प्रा.लि.विरुध्द महावितरण या प्रकरणी रिप्रझेन्टेशन नंबर १४० /२००९ च्या निवाड्याचे अवलोकन केले असता सदर प्रकरणी अपीलार्थी हे वीज पुरवठा रिसर्च व फार्मासिटीकल  प्रकियेसाठी वापरात असल्यामुळे व कोणत्याही प्रकारचे उत्पादन करीत नसल्यामुळे वीज नियामक आयोगाने निर्गमित केलेला आदेश प्रकरण नं. १११/२००९ डिसेबर २००९  अन्वये अपीलार्थी यांना लागू केलेले फिरत्या पथकाच्या तपासणी अहवालानुसार वाणिज्यक दर संकेत गैरअर्जदाराने लागू केले आहेत. तसेच अपीलार्थीने सादर केलेले संचालक उद्योग व सुरक्षा महाराष्ट्र शासन यांचे मार्फत दिलेले  औद्योगिक नोदणी प्रमाणपत्र हे वीजचे दर संकेत ठरविण्यासाठी ग्राह्य धरता येणार नाही. अपीलार्थी कोणतेही मोठ्या प्रमाणावर उत्पादन करीत नसुन केवळ रिसर्च व फार्मासिटीकल प्रक्रिया करीत असल्यामुळे गैरअर्जदाराने लावलेले वाणिज्यक दर योग्य आहेत  असे मत नोदवुन अपीलार्थीचे अपील नामंजुर केले आहे.

अर्जदाराने सादर केलेल्या विद्युत लोकपाल नागपुर  यांचे मे जिंदाल सिड्स, मे मायकोफिल्ड हैब्रीड सिड्स व सनराईज फुड प्रकरणी एकत्रीत दिलेला निवाडा क.२५/२०१३चे अवलोकन केले असता

फिरते पथक यांनी केलेल्या स्थळ तपासणी अहवालात दर्शविलेल्या मशिनरीचा वापर विचारात न घेता वाणिज्यक पध्दतीने दर आकरणी करण्याचे मत नोदविलेले आहे. तसेच गैरअर्जदार यांना दर संकेत वर्गवारी निर्धारण करण्याचे अधिकार असले तरी अपीलार्थीना पुर्ण संधी न देता दर संकेत निर्धारित करण्यात आलेले आहेत असे मत नोदवुन मंचाचे आदेश रदद्र ठरविलेले आहेत.

वरील प्रमाणे विद्युत लोकपाल मुंबई व नागपुर यांचे आदेश तसेच वीज नियामक आयोग यांनी निर्धारित केलेले दर संकेत व या प्रकरणी फिरत्या पथकाने दिलेला वस्तुनिष्ठ अहवाल विचारात घेता या प्रकरणाशी विद्युत लोकपाल मुंबई यांनी केश नंबर १४०/२००९ मध्ये दिलेल्या निवाडा प्रकरणाशी अर्जदाराचे प्रकरण साम्य आहे. कारण अर्जदार कोणत्याही प्रकारचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करित नसुन केवळ कच्या मालावर प्रकिया करतो. तसेच महाराष्ट्र शासणाच्या अद्योगिक नोंदनी प्रमाणपत्राचा अधार वीज दर वर्गवारी ठरवितांना घेता येणार नाही असे विद्युत लोकपाल मुंबई व वीज नियामक आयोग यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे वीज नियामक आयोगाने निर्धारारीत केलेल्या दर संकेताच्या वर्गवारीनुसार अर्जादारास वाणिज्यक दराने दिलेले वीज बिल आकारणी योग्य आहे असे या मंचाचे मत आहे. परंतु गैरअर्जदाराने दिलेले एकुण ४१ महीन्याच्या वर्गवारीतील फरकाचे वीज बिल अयोग्य असून भारातीय विद्युत कायदा २००३ शी विसंगत आहे.म्हणुन मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१) अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.
२) गैरअर्जदाराने लावलेले ४१ महीन्याचे वीज बिल ४,२९,१७७/- रुपये रदद्र करण्यात येते.
३) गैरअर्जदाराने अर्जदारास वाणिज्यक दराने स्थळ तपासणी पुर्वीच्या २४ महीन्याच्या वर्गवारीतील फरकाचे वीज बिल द्यावे.

स्वाक्षरी
विलासचंद्र सु. काबरा
सदस्य

स्वाक्षरी
सुर्यभान कि. नरवडे
सदस्य/सचिव